# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## कार्यालयीन आदेश
(गोपनीय विभाग)

क्र.संगाबाअवि/५/गोप./५६२/२०२१ दिनांक :- २२/१०/२०२१

विषय :- **संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामधे शैक्षणिक कामाकरिता बाहेरगावावरुन येणा-या विद्यार्थ्यांना सलग दोन दिवस विद्यापीठामधे काम असल्यास परीक्षक वसतिगृहामधील कक्ष निःशुल्क पुरविण्याबाबत.**

दिनांक ०५/०९/२०१८ विषय क्र. १३७ अन्वे व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने बाहेरगावावरुन येणा-या विद्यार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे सुविधा पुरविण्यात येत आहे.

| अ. क्र. | अतिथीचा प्रकार | केलेली सुविधा |
|---|---|---|
| १ | शैक्षणिक कामाकरिता बाहेरगावावरुन विद्यापीठामधे येणारे विद्यार्थी | एका सत्रातील परीक्षेकरीता सलग दोन दिवसांकरिता विद्यापीठात विद्यार्थ्यास काम असल्यास त्या विद्यार्थ्याला एक दिवस परीक्षक वसतिगृहातील कक्ष निःशुल्क पुरविण्यात येईल. अशा विद्यार्थ्याने दोन दिवसापेक्षा जास्त दिवस निवास केल्यास अधिसुचना क्र. ६३/२०२० दि. २२/०९/२०२० मधील अनुक्रमांक १ अन्वये प्रतीदिन रु. ३०/- प्रमाणे दर आकारण्यात येतील. |

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती

प्रत माहितीस्तव अग्रेषित :-
(१) मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
(२) मा. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
(३) वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
(४) जनसंपर्क अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना माहिती तथा प्रसिध्दीस्तव

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

बाहेरगावावरुन स्वतःचे शैक्षणीक कामाकरीता विद्यापीठात येणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षक वसतीगृहातील कक्ष उपलब्ध होण्याकरीता करावयाचा अर्ज

( टिपः- अर्जदाराने पुर्ण माहिती स्वतःच्या हस्ताक्षरात भरावी)

प्रति,

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

विषयः- परीक्षक वसतीगृहातील कक्ष उपलब्ध करुन देण्याबाबत

महोदय/महोदया,

मी खालील सही करणार विनंती करतो / करते की, विद्यापीठामध्ये माझ्या शैक्षणिक कामाकरीता बाहेरगावावरुन आलो/आली असून आज माझ्या कामाची अन्य कारणाने पुतर्ता न झाल्यामुळे मला राहण्याकरीता परीक्षक वसतीगृहातील कक्ष उपलब्ध करुन देण्यात यावा, ही विनंती.,

### माझी परीक्षेसंबंधीत माहिती खालीलप्रमाणे आहेत.

(१) पूर्ण नांव (मराठी) :- श्री/श्रीमती/कु. ..............................................
(२) पूर्ण नांव (इंग्रजी):- Shri/Smt. /ku.................................................
(३) परीक्षेचे पूर्ण नावं :-........................................................................
(४) परीक्षेचे वर्षः- उन्हाळी / हिवाळी ...................................................
(५) परीक्षेचा परीक्षा क्रमांकः- ..............................................................
(६) नामांकन / नोंदणी क्रमांकः-...........................................................
(७) ज्या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत आहे. त्या महाविद्यालयाचे नांवः-......................
(८) विद्यार्थ्याचा प्रकारः- महाविद्यालयीन/माजी विद्यार्थी/बहिशालः-..........................
(९) ज्या कामासाठी विद्यापीठात आलात त्या कामाचा सविस्तर तपशीलः-...........................
.......................................................................................................
.......................................................................................................
(१०) ज्या तारखेला परीक्षक वसतीगृहामध्ये निवास करावयाचा आहे ती तारीखः-.......................

दिनांकः- / /२०

आपला विश्वासू,

(अर्जदाराची स्वाक्षरी)

पूर्ण पत्ताः-
......................................
......................................
......................................
पीन कोड......................................
मोबाईल नंबरः-..............................

**(सुचनाः- ज्या विभगाशी काम असेल त्या विभागाचे संबंधित सक्षम अधिकाऱ्याची शिफारस आवश्यक राहील.)**

---

**(कार्यालयीन उपयोगाकरीता)**

श्री/श्रीमती/कु. ..........................................................................................
यांचा अर्ज दिनांक ..............................रोजी प्राप्त झाला त्यांना दिनांक ...........................
रोजी परीक्षक वसतीगृहातील कक्ष उपलब्ध करुन द्यावा.

अधीक्षक

## बाहेरगावावरुन स्वतःचे शैक्षणीक कामाकरीता विद्यापीठात येणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता परीक्षक वसतीगृहाच्या आरक्षणासंबंधी अटी व शर्ती

(१) परीक्षक वसतीगृहात आरक्षणासाठी प्राधान्यक्रम परीक्षकास/नियामकास, प्राश्नीकास आणि परीक्षेच्या इतर कामास येणाऱ्या व्यक्तीना राहील.

(२) परीक्षक वसतीगृहाचे आरक्षण दुरध्वनी अथवा मौखीक आदेश / सुचनेनुसार करण्यात येणार नाही.

(३) परीक्षक वसतीगृहाचे आरक्षणाकरीता रीतसर लेखी स्वरुपात मागणी आल्यास वरीष्ठांच्या मान्यतेला अनुसरुन कक्ष उपलब्ध करुन देण्यात येईल.

(४) परीक्षक वसतीगृहातील कक्षाचे प्रति व्यक्ती भाडे शुल्क पहिल्या एक दिवसाकरीता (२४ तास) निःशुल्क राहील. व दुसऱ्या दिवशी पासुन प्रती व्यक्ती रू. ३०/- आकारण्यात येईल.

(५) परीक्षक वसतीगृहाचे आरक्षण ज्यांनी केलेले असेल त्यांनी आरक्षणाची अग्रीम रक्कम आरक्षणाचे वेळी जमा करावी लागेल. त्याशिवाय कक्षाचे आरक्षण झाले असे गृहीत धरता येणार नाही.

(६) परीक्षक वसतीगृहाच्या आरक्षणा शिवाय कोणत्याही व्यक्तीला अर्ध्या तासाच्या कालावधीकरीता सुध्दा कक्ष उघडून दिल्या जाणार नाही. याकरीता तेथील कार्यरत व्यक्तीशी वादविवाद करु नये.

(७) एका कक्षात एकापेक्षा जास्त व्यक्ती राहिल्यास व त्यापैकी एकाच व्यक्तीला विनामुल्य राहण्याची परवानगी असल्यास सोबतच्या व्यक्तीचे नियमानुसार भाडे आकारण्यात येईल.

(८) एका कक्षात तीन व्यक्तीपेक्षा जास्त व्यक्ती राहू शकणार नाही.

(९) मद्यपान केलेल्या व्यक्तींना कुठल्याही परिस्थितीत परीक्षक वसतीगृहात प्रवेश मिळणार नाही. तसेच कक्षामध्ये मद्यपान व धुम्रपान करण्यास सक्त मनाई आहे.तसे आढळल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(१०) कक्ष आरक्षणाकरीता स्वतःचे ओळखपत्र / आधार कार्ड/ पॅन कार्ड व ज्या कामाकरीता आले आहे त्यासंबंधीचे पत्र सोंबत असणे आवश्यक आहे.

(११) परीक्षक वसतीगृहातील कार्यरत व्यक्तींना परीक्षक वसतीगृह नियमावलीनुसार सहकार्य करावे.

(१२) परीक्षक वसतिगृहाच्या आरक्षणासाठी प्राधान्यक्रम ठरलेला असल्यामुळे कक्ष उपलब्ध असल्यास देण्यात येईल.

आदेशान्ये